महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९१४८६
ई-मेल - desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ- ईमेल

क्र.१८/डीबीटी/वि.का.पत्र.(SGS)/२०२०/१८९
दिनांक : ०३/०८/२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई /पुणे /नाशिक /औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय:- शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता प्राप्त न झालेल्या विद्यार्थ्यांच्या / संस्थेच्या तक्रारीबाबत ...

संदर्भ :- या संचालनालयाचे स्मरणपत्र क्र. १८/ईबीसी/डीबीटी/२०१९/५४० दि.०२/१२/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, डीबीटी पोर्टलवर सन २०१८-१९ /२०१९-२० या वर्षासाठी संस्थेच्या लॉगीनमध्ये उपलब्ध झालेल्या विद्यार्थ्यांचा उपस्थितीचा अहवाल संस्थांनी न भरल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता प्राप्त न झाल्याने विद्यार्थी यांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

तरी याबाबत असे कळविण्यात येते की, संदर्भीय पत्रानुसार या संचालनालयाकडून डीबीटी पोर्टलद्वारे योजनेचा लाभ प्राप्त होण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत कळविण्यात आलेले होते. तरीदेखील दि.०३/०८/२०२० च्या डीबीटी डॅशबोर्डनुसार, दुसरा हप्ता प्राप्त होण्यासाठी सन २०१८-१९ चे १०६८ व सन २०१९-२० चे १५२३ विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल संस्थाकडून भरण्यात आलेला नाही. विद्यार्थ्यांची उपस्थिती भरणे प्रलंबित [Pending at Institute level, (२nd installement)] असल्याबाबतचा विभागनिहाय, योजनानिहाय तक्ता सोबत जोडलेला आहे आणि ही सर्व संस्थानिहाय माहिती विभागीय कार्यालयाच्या लॉगीनमध्येदेखील उपलब्ध आहे. तरी सर्व विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व अशा संस्थांना ज्यांच्या लॉगीनमध्ये सन २०१८-१९ /२०१९-२०. साठीच्या योजनेच्या दुसऱ्या हप्त्याच्या लाभासाठी विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरणे प्रलंबित आहे अशा संस्थांना सूचना देऊन उपस्थिती अहवाल ८ दिवसांच्या आत भरण्याबाबत कळविण्यात यावे. त्यानंतरही जर कोणत्या संस्थेच्या लॉगीनमध्ये उपस्थिती अहवाल भरणे प्रलंबित राहिल्यास अशा संस्थांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात यावा आणि त्याची एक प्रत या कार्यालयाला देण्यात यावी.

तसेच, विभागीय कार्यालयाने महाडीबीटी पोर्टलवर त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होत असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाच्या अद्ययावत तपशीलानुसार विद्यार्थी / संस्था स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जावरील कार्यवाही पूर्ण करण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात यावी. जेणेकरुन कोणतीही कार्यवाही विद्यार्थी / संस्था स्तरांवर प्रलंबित राहाणार नाही.

आपला,

(डॉ. अभय वाघ.)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

---

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर
पत्र क्र. तंशिसं/विकाना/ईबीसी/२०२०/ 1650
दि. 4 AUG 2020

प्रति,
सर्व पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, त्यांनी ईबीसी शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता प्राप्त होण्याकरिता वरिल पत्रात नमूद केल्याप्रमाणे ८ दिवसाच्या आत कार्यवाही करण्यांत यावी. ज्या संस्थांनी विद्यार्थ्यांची उपस्थिती अहवाल ऑनलाईन भरला नाही अशा संस्थांकडून खुलासा मागविण्यांत येईल याची संस्थेने दखल घ्यावी.

(डॉ. राम निबुदे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.